# उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा वाशीम




<u>सौ.नंदा मुंदे यांना सेंद्रिय शेतीतील जैविक इंडियन हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान !!!</u>

**उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा वाशीम** अंतर्गत महिला स्वयं सहाय्यता गटात सदस्य असलेल्या भामदेवी ता. कारंजा जि. वाशिम येथे कृषी सखी म्हणून कार्यरत असलेल्या सौ.नंदा संतोष मुंदे यांना सेंद्रिय शेतीमध्ये चांगल्या पद्धतीचे उत्पादन आणि लक्षवेधी नफा मिळवल्याबद्दल नुकताच राष्ट्रीय स्तरावरील जैविक इंडियन हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्कार मुळे सर्व स्तरावर नंदाताई यांनी उमेद अभियानाचे नाव आणि स्वतःचा कर्तृत्व सिद्ध केला आहे. सेंद्रिय शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर क्रांतिकारक कार्य केल्यामुळे आणि कमी जमिनीमध्ये जास्तीत जास्त उत्पादन घेऊन मोठ्या प्रमाणात नफा मिळविल्याने त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.रोख रुपये ५० हजार आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे .सौ.सुनंदाताई मुंदे करत असलेली शेती सेंद्रिय शेती प्रकल्प PGS प्रमाणीकरण प्राप्त आहे.

२०२२ ते २०२४-२५ या वर्षामध्ये ताईंनी सोयाबीन, तुर,गहु,हरभरा या पिकांचे दोन एकर क्षेत्रामध्ये सेंद्रिय पद्धतीने शेती केली. एकूण २६ हजार रुपयांच्या भांडवला मध्ये ताईंनी ही सेंद्रिय शेती केली त्यातून २२ क्विंटल सोयाबीन, ८ क्विंटल तुरीचे उत्पादन घेतले. या उत्पादनातून सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून ताईंनी एकूण १४५२४५/- रुपये नफा मिळवला आहे. राष्ट्रीय स्तरावर प्रथम पुरस्कार

मिळाल्याबद्दल उमेद अभियानाचे जिल्हा अभियान संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि प वाशीम श्री वैभव वाघमारे आणि प्रकल्प संचालन श्री किरण गणेश कोवे यांनी अभिनंदन केले. तसेच पुरस्काराबद्दल ताईंचे सर्व स्तराकडून कौतुक होत आहे.


2025/1/18 15:24


2025/1/18 15:45






14
Bailley